International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 40 September - October - 2025

# संविधान हेच शस्त्र मानणारी आदिवासी कविता

**विनायक पवार**

*Corresponding Author – विनायक पवार*
**DOI - 10.5281/zenodo.17657127**

आदिवासी समुदायाची सार्वत्रिक आणि सर्वंकष उपेक्षाच आज दिसून येत आहे.वाढत जाणारी दरी आणि बेगडी, कागदी मलमांचे देखावे कोणत्याच प्रश्नांना होकारार्थी उत्तर देतील असे वाटत नाही. फार पूर्वी भा.रा. तांबे यांनी

आदिवासी हा असे तरीपण
समाजात हा अंत्य राहिला
मानवातल्या जाणवतेची
साक्ष द्यावया सकल जगाला,असे लिहून ठेवले आहे.

निसर्ग नियमाने पहिल्या पंक्तीत बसणारा पोटभर जेवतो किंवा जेवतो तरी पण वाढणाऱ्यांनी योजलेला कट व्यवस्थित शिजला तर कित्येक पोटांना पाण्यावर भागवावे लागते. सनातन व्यवस्था निरखून पाहिल्यास या देशातील मूळ मालकांना त्यांचा वाटा नाकारण्यात आलेला आहे असे स्पष्टपणे दिसून येते.

या देशातील सामाजिक इतिहास पाहिला तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या परिसर स्पर्शाने दलितांना आत्मभान प्राप्त झाले. ग्रामीण जनतेच्या घामाने चेतना प्राप्त करून घेताना साहित्यात उपरोक्त दलित आणि ग्रामीण प्रवाह ताकतीने पुढे आलेले दिसतात. तसेच स्त्रीवादी साहित्यने देखील दास्या विरोधात नोंदवलेली प्रतिक्रिया लक्षवेधी ठरली आहे.

आज आदिवासी साहित्य प्रवाहाने कथा कादंबरी नाटक एकांकिका व काव्य प्रकारात लक्षणीय कामगिरी केलेले आपल्याला दिसून येते. आदिवासी कविता आज सर्वार्थाने अस्तित्व सिद्ध करताना दिसत आहे त्या काव्यात उपेक्षेचा सूर गडदपणे उमटलेला असणे अगदी साहजिक होते ते तसे झालेले ही आहे आदिवासी साहित्य ही संकल्पना स्पष्ट करताना डॉक्टर विनायक तुमराम म्हणतात, आदिवासी साहित्य हे कोणत्याही साहित्याची प्रतिकृती नाही कोणत्याही प्रेरणांचा अविष्कार नाही ते स्वयंभू व स्वयं सिद्ध आहे त्याच्या प्रेरणा त्याच्या अस्तित्व इतक्याच प्राचीन व प्रत्येक आहेत या साहित्याने आज भारतीय साहित्याच्या इतिहासात मानाचे स्थान कायम केले आहे. आदिवासी हे देशातीलच नव्हे तर अखिल विश्वातील मूळ मानव समूहाचे व डोळ्यांचे सांस्कृतिक मूल्यांनी नटलेले नवे जुने साहित्य एवढे व्यापक स्वरूप आहे,[1]

या वैश्विक साहित्यातील कवितेने आंतरिक वेदनेचा घनाघाती प्रहार केलेला दिसून येतो. इथल्या समाजाचा आपल्याच भूमी जणांशी असलेला व्यवहार हा किती विसंगत आणि क्रूर आहे हे आपण पाहिले पाहिजे. इंग्रजांची क्रूरता मोगलांच्या कपटी लबाड्या, विश्वासघात पेक्षा इथल्या माणसांचे दुटप्पी धोरण हे फार

विचित्र आहे. कणाकणात ईश्वर आहे असं मानणाऱ्या देशामध्ये मात्र माणसातला माणूस दिसू नये हे फार भयंकर आहे.

कोणत्याही तीन माणसांची ओळख आणल्याशिवाय तुला शाळेत प्रवेश नाही तवा मी बिरसा काका तंट्या नाना अंबरसिंग महाराजांची ओळख काढली,[2]

(उलगुलान भुजंग मेश्राम)

ही ओळख आज आदिवासी साहित्यातील कवितेची ओळख होऊन बसली आहे वाटा संपलेल्यांनी वाटा मिळण्याची वाट न बघता विद्रोहाचे पोवाडे गाणे संगत कसे आहे हे ही कविता पटवून देते.

गोंडवन पेटले आहे या काव्यसंग्रहातील मी वनवासी या कवितेत विनायक तुमराम म्हणतात, ज्या वाटांवर माझ्या स्वप्नांचे रक्त शिंपीत इतिहास निघून गेला माझ्या अस्तित्वाच्या सभोवताल पुरलेले माझ्या नातेवाईकांचे पराजित सांगाडे रोज माझ्या अशांत नेत्रात झोकून जातात तुमच्या पशुत्वाचा प्रतिशोध[3]

वेदनेची भाषा मलूल असण्याचा काळ आता संपल्याची ही पावती आदिवासी कवितेत जागोजागी सापडते आदिवासी या शब्दाचा समानार्थी शब्द म्हणून नक्षलवादी हा शब्द जागा घेऊ पाहतो आहे. आदिवासीला वनवासी बनवण्याचा घाटही धूर्तपणे घातला गेल्याचे आपण पाहतो. इथल्या वेगवेगळ्या धर्मांनी आदिवासींवर वेगवेगळे सांस्कृतिक हल्ले करण्याचा कार्यक्रम आरंभीला आहे. आदिवासी म्हणजे शस्त्र या धारणेला छेद देणारे बाबाराव मडावी लिहितात,

तुमचे काळे कुठे मनसुबे आम्हाला पारतंत्र्य करणारे आमच्या हिरव्या वनाला आग लावणारे पण लक्षात ठेवा आता आम्ही सावध झालो आहोत आमच्या हाती घटनेचे शस्त्र आले आहे

(उजेड) [4]

इगतपुरीचे लोककवी तुकाराम धांडे यांच्या वळूया काव्यसंग्रहात सांगतात साहेब इथं कशाचा देश धरम अं जातपात इथे मरणाशी आट्यापाट्या खेळत पाणी गौशीत फिरणं आणि पाण्या वाचून मरण हीच एक रीत भात साहेब इथे कशाचा देश धर्म अन जातपात[5]

आदिवासींच्या मूलभूत प्रश्नांकडे व्यवस्थित दुर्लक्ष केले गेले आहे एकीकडे मिनरल वॉटरचा आग्रह धरला धरला जातो पाळीव कुत्र्यांसाठी बिस्किटे आहेत पण दुसरीकडे भुकेने तडफडणाऱ्यांचा आकांत कानाड केला जातो या विसंगतीचे काय जात धर्माच्या नावावर निवडणुकांचे पीक घेणारी माणसं येथे आहेत धर्माचा बाजार करून स्वस्थ दरात देव विकणारी श्रद्धेवरचं लोणी खाणारी माणसे येथे आहेत तर दुसरीकडे आदिवासींना पाणी शोधत वणवन फिरावं लागतं प्रसंगी पाण्यासाठी जीवाशी खेळ होतो हे दाहक वास्तव तुकाराम धांडे व्यक्त करतात.

लटारी मडावी म्हणतात जंगली जीवन माझे वोटिंग कार्ड नाही मॉडर्न लोकशाहीत मतदानाचा हक्क बजावता येत नाही लोकशाही राष्ट्र माझे पण मी राष्ट्राचा नाही देशाच्या राष्ट्रगीतात माझा समावेश नाही लोकशाही माझी आहे पण मी लोकशाहीत नाही,

उपेक्षित असल्याची चिड अत्यंत स्वाभाविक आहे महासत्ता होण्याच्या गप्पा आपण दिवस-रात्र मारत असताना आदिवासींकडे मतदान कार्ड असू नये यापेक्षा वाईट दुसरे काय असू शकेल सामान्यांचा भ्रमनिराश या देशाच्या लोकशाहीला सर्वाधिक नुकसान पोहोचू शकतो ही सलमडावी यांच्या या कवितेत आपल्याला सापडते.

रानवा या काव्यसंग्रहात कवी सखाराम डाखोरे लिहितात

काळाची रूप अजूनही बदलतील अजूनही भेडसावतील कुटील द्रोणाचार्यांचे डाव तरीही आदिमतेची जाणीव घेऊन एकलव्याची जिद्द घेऊन चालायचं तुलाही उत्क्रांतीच्या दिशेने [7] (रानवा पृ 109)

बिरसा हिताला उद्देशून आलेली ही कविता काळाचा चेहरा ओळखते ढोंग आणि कावे बाजारचे मुखवटेवर वाढते तदबतच येणाऱ्या प्रवासाला आदिम सत्याचे इंधन देते एकलव्याच्या वाट्याला आलेली धुर्त चाल परतावून एका विलक्षण संघर्षाला सामोरे जाण्याची जिद्द डाखोरे यातून रेखाटतात.

व्यवस्था गळ टाकून शिकार करण्यात नेहमीच तळवेज असते सत्ता संघर्ष धर्म संघर्ष अर्थ संघर्ष यात सामान्य हवाच असतो प्यादा म्हणून या प्याद्यांचा सपकाळ पणे वापर केला जातो दंगलित पहिला दगड मारणारा आणि मरणारही हाच असतो सामान्य स्वतःला प्रज्ञावंत समजणाऱ्यांचे गोडवे गाण्यात धन्यता मानतो याचे चांदेकरांना वाईट वाटते ते कॅमेरा या कवितेत लिहितात,

नागवे होऊन जंगल फिरलो तेव्हा कॅमेरे आमच्या पाठीशी होते अस्मितेचे बंड पुकारले तेव्हा पोलिस आमच्या पाठीशी होते

यालाच म्हणतात माय खाऊ घालीना आणि बाप भीक मागू देईना चांदेकरांनी नेमके मर्म पकडले आहे आदिवासींची होणारी ही दुहेरी फरफट त्यांना अस्वस्थ करते.

कोणत्याही धारदार शस्त्रापेक्षा घटनेचे शस्त्रागार फार मौल्यवान आहे त्या आधारेच वर्तमान कोंडी फोडली जाऊ शकते अशी आशावादी उदाहरणे आज उपलब्ध असली तरी उपेक्षितांना हा मार्ग परवडणारा आहे हे अजून सिद्ध व्हायचे आहे.

शिक्षणाने वाटा कळल्या पळवाटा कळल्या तसेच इथला काव्यवाच पण आहे त्यांच्या लक्षात आला

मुन्नीबाई आज स्वप्नात नाही वास्तवाचे भान आहे तिला पशुतला माणूस आणि माणसातल्या पशूची जाण आहे तिला

मुन्नीबाई गड्डु आत्राम

लाथाडलेपणाची चित्रे काढणारे अनंत आहात आज काव्याचे वर्तुळ मोठे करण्यात गुंतले आहेत उत्तमराव धोंगडे वाहरु सोनवणे सुखदेव उईके उषा किरण आत्राम सुनील कुमरे नीलकांत कुलसुंगे, कुसुमालाम कृष्णकुमार चांदेकर माधव सरकुंडे इत्यादी कवींची फळी आज लिहीत आहे.

आज आदिवासी कविता वेदना अधोरेखना बरोबरच निसर्ग स्त्रीदास्य आधुनिकीकरण जागतिक मानव्याच्या अवमूल्यन इत्यादी विषय मांडताना दिसते आहे मराठी कवितेच्या कक्षा रुंदावण्याचे कार्य आदिवासी कविता करीत आहे.

**संदर्भसूची**:


1. तुमराम विनायक शतकातील आदिवासी कविता हरिवंश प्रकाशन चंद्रपूर 2003 प्र 11
2. मेश्राम भुजंग उलगुलान
3. तुमराम विनायक गोंडवन पेटले आहे
4. मडावी बाबा राम उजेड
5. अत्राम गडू मुन्नीबाई
6. धांडे तुकाराम वळीव राजाहंस प्रकाशन पुणे प आ 2008 प्रो 34
7. डाखोरे सखाराम रानवा डिंपल प्रकाशन मुंबई 2019, पृ 109
8. तुमराम विनायक संपा शतकातील आदिवासी कविता प्र 222/226